


**About Us: http://www.galaxyimrj.com/about-us/**
**Archive: http://www.galaxyimrj.com/archive/**
**Contact Us: http://www.galaxyimrj.com/contact-us/**
**Editorial Board: http://www.galaxyimrj.com/editorial-board/**
**Submission: http://www.galaxyimrj.com/submission/**
**FAQ: http://www.galaxyimrj.com/faq/**

# आदिवासी कविता

**वृषाली राजेंद्र धाडसे**
संशोधनकर्ती,
स्व .सी. एम. कढी महाविद्यालय,
अचलपूर कॅम्प ( १४२ ).
**डॉ .प्रमोद भी. गारोडे**
मार्गदर्शक,
प्रोफेसर व विभाग प्रमुख,
पदव्युत्तर मराठी विभाग,
बी.एस.पाटील महाविद्यालय,
परतवाडा. जि.अमरावती.

**प्रस्तावना:**

'शब्दात जिच्या धार आहे,तिच ढाल तिच तलवार आहे,किती सोसले तिने वार आहे,अशी आदिवासी कविता निराकार आहे'.मुळातच लढवय्यी असलेली आदिवासी कविता वाचताना आपल्यासमोर उभी राहते ती संपूर्ण आदिवासी संस्कृती.कुठे ती स्वच्छंद आहे कुठे रूढी परंपरेच्या आवर्तनात बंदिस्त आहे.कुठे लडिवाळ संस्कृतीच्या वारुळात खुश आहे तर कुठे सुर्याच्या दिशेने पाऊल टाकत आधुनिक जगाला आव्हान देत स्वयंप्रकाशित लखलखणारी तेजस्वी ज्योत आहे. आदिवासी कविता म्हटले की आपल्यासमोर येते ती प्रा.डॉ.विनायक तुमराम यांच्या 'रानगर्भातील जखमा ', ' गोंडवन पेटलेले आहे ' या काव्य संग्रहातील कविता.भुजंग मेश्राम यांच्या 'आदिवासी कविता 'या काव्य संग्रहातील कविता,वाहरू सोनवणे यांचा 'रोडाली 'आणि 'गोधड 'हा काव्य संग्रह.मेंदूला झिनझिन्या आणणारी ज्यांची कविता आहे अशी कवयित्री उषाकिरण आत्राम यांचा 'लेखणीच्या तलवारी ' हा काव्यसंग्रह. 'आदिवासी स्वातंत्र्याचा जाहीरनामा' हा प्रा.डॉ.संजय लोहकरे यांचा काव्यसंग्रह, 'रानपाखरांची माय' हा सौ. कुसुम आलम या कवयित्रीचा काव्यसंग्रह आणि 'माझी सनद कुठे आहे' हा चामुलाल राठवा यांचा काव्यसंग्रह आणि आदिवासी जिवनाविषयी लिहिलेल्या कविता .

आदिवासी कवितेबद्दल लिहिताना डॉ.अक्षय कुमार काळे, 'उलगुलानव्रती' या प्रा.डॉ.विनायक तुमराम यांच्या गौरव ग्रंथात लिहितात की, "आदिवासींना हे आत्मभान उशिरा येण्याची दोन

कारणे आहेत व या कारणांचा त्यांच्या अस्तित्वावर,प्रतिक्रियांवर आणि आविष्कारावर मुलगामी परिणाम झाला आहे.एक तर आदिवासी नागर संस्कृती पासून दूर आहेत त्यांची स्वतःची संपन्न संस्कृती आहे की जिच्याविषयी त्यांची तक्रार नाही. "१

डॉ. अक्षय कुमार काळे यांनी आदिवासी समूहाच्या सुसंपन्न मानसिकतेविषयी सांगितले आहे. निसर्गाच्या सान्निध्यात राहतांना आदिवासी निसर्गाशी कसे एकरूप होतात याचे आकलन होते. प्रा.डॉ.विनायक तुमराम,कवयित्री उषाकिरण आत्राम्, प्रा. डॉ. संजय लोहकरे यांच्या कवितेतून आदिवासींचे जे भावविश्व आहे त्याचे दर्शन होते .आदिवासी बंधू भगिनींना संबोधीत करण्याची त्यांच्या कवितेत ताकद आहे .अशा व्यापक आशय घनतेच्या कवितांचा थोडक्यात आढावा घेता येईल .

***१. प्रा.डॉ.विनायक तुमराम -रानगर्भातील जखमा***

आदिवासी चळवळीत प्रामुख्याने घेतले जाणारे नाव म्हणजे प्रा.डॉ. विनायक तुमराम.आदिवासी बंधू-भगिनींच्या हक्कासाठी लढणारे व्यक्तिमत्व. 'उलगुलानव्रती'या प्रा. डॉ. विनायक तुमराम यांच्या गौरव ग्रंथात डॉ.प्रमोद मुनघाटे त्यांच्याबद्दल लिहितात की "आदिवासी साहित्य हे एखाद्या प्राचीन वेलीवर फुललेले फूल असेल,तर ती वेल ज्या अति प्राचीन वृक्षावर विसावली आहे,तो वृक्ष म्हणजे 'आदिवासी चळवळ' होय.या चळवळीचे जे खंदे आधारस्तंभ आहेत,त्यातील एक प्रमुख नाव म्हणजे डॉ.विनायक तुमराम. " २

आदिवासींच्या प्रश्नाला समाजापुढे आणणारे डॉ.विनायक तुमराम.यांच्या साहित्यातून आपल्याला आदिवासींचे शोषण,त्यांच्या भावभावना,उच्चभ्रू लोकांची वागणूक,लढा लढताना सभोवताली सतत फिरणारे विचार चक्र आणि त्यांना सामोरे जाण्याचे प्रचंड बळ त्यांच्या कवितेत दिसते ते आपल्या 'आदिवासी धर्म 'या कवितेतून प्रकट होतांना लिहितात की ,

'निसर्ग वसतो धर्म तुझा

अणूरेणूत नांदते तुझी संस्कृती

समता तुझे जीवनमूल्य

सोड अंधश्रद्धा अन् विकृती ..

धर्मरंगी तू रंगू नकोस

स्वत्वास भस्म फासू नकोस

ढोंगी चकव्यांचा ब्रम्हनाद

कानी ठुसून इतरावू नकोस .. ' ३

या कवितेतून कवी आदिपुत्रास आवाहन करतो,आपल्या हक्कांबद्दल जाणून घेण्यास सांगतो.आदिवासी संस्कृती ही चराचरात वसलेली आहे आणि निसर्गाने सांगितलेला मानवता धर्म हाच खरा धर्म आहे असे कवी कवितेतून संदेश देतो.अंधश्रद्धा आणि विकृती सोडून समतेचेच जीवनमूल्य स्वीकारावे अशी भावना कवी व्यक्त करतो.अंधश्रद्धेमुळे विकासात अडथळा येतो, अकारण भीती वाढते आणि जगाच्या पाठीवर आपण मागे पडतो म्हणून अंधश्रद्धा आणि विकृतीचा विरोध त्यांच्या काव्यातून स्पष्ट होतो. पुढे आपल्या बांधवांना आदिपुत्रांना उद्देशून लिहितात की आपल्या मध्येच आपल्या पुरतच जगू नका . जग खूप मोठे आहे ,संस्कृती आणि धर्माच्या रंगात वावरतांना जगाचा विसर पडायला नको.स्वतःची ओळख निर्माण करा.कवीने स्वत्वाचे भस्म हे रूपक योजिले आहे .या ओळीचा अर्थ आशयगर्भित आहे.भस्माचा रंग पांढरा शुभ्र चकचकीत असतो.हे ठाम निश्चयरूपी भस्म भाळी लावल्यास व्यक्तिमत्त्वाचा उत्कर्ष आणि विकास झाल्याशिवाय राहणार नाही.आजूबाजूला ढोंगी चकव्यांचा ब्रम्हनाद म्हणजे आजूबाजूला जे लोक मुखवटे बदलवून बोलतील,चकवा म्हणजे अशी हवा जी आपल्याला तिच्यासोबत वाईट मार्गाने वाहून नेते आणि माणसाला कळतच नाही.तर अशा चुकीच्या लोकांच्या नादाला लागून आपले आयुष्य नाश होण्यापासून स्वतःला वाचव असा सल्ला वजा विनवणी कवी आदिपुत्रास करतो.परिवर्तनाविषयी उठवलेला एल्गार आपल्याला कवीच्या काव्यातून दिसून येतो पुढे लिहिताना ते म्हणतात ,

"आपल्या कुळाची साक्ष पटावी म्हणून

बेसूर चेहऱ्यांच्या सामूहिक बलात्कारात

रोज चिरडल्या जाणारा

तुमचा असहाय आकांत

दिशादिशातून - गावागावातून

रोज माझ्या कानावर येतो

तेव्हा भयानक संहार

माझ्या शब्दात घेऊन

मी सज्ज होतो

पण खरेच

माझ्या एकट्यानेच हे युद्ध पेटेल काय .. ? " ४

आदिवासी स्त्रियांवर होणाऱ्या स्त्रीविषयक अत्याचारास दुःखास कवी शब्दबद्ध करतो .गावागावातून येणाऱ्या बातम्यांनी कविमन विव्हळून जाते.माय बहिणींना लढा देण्यासाठी कवी आवाहन करतो.हा लढा लढताना कधी कवीला स्वतःलाच प्रश्न पडतो की त्याच्या एकट्यानेच युद्ध लढल्या जाईल का? यामागील मतितार्थ हाच आहे की प्रत्येकाला आपल्या हक्कासाठी लढता आले पाहिजे .आपल्या अधिकारासाठी सर्वांनी पेटून उठलं पाहिजे कदाचित कवीला असे म्हणावयाचे आहे की,अगं डोंगरमाये,'दुःख दळू सुख पाडू

आम्ही लावतो गं हात ...तु हिरकणी तु माळराणी,आता टाक ना जरा कात .... !' पुढे झडप या कवितेमध्ये कवी म्हणतो की

"रानातल्या दिव्यांना

आज वादळाची भीती नाही

विझून जाण्याची आशंकाही नाही

त्यांनी शोधले आहेत आता

पहाडांच्या भक्कम सुरक्षित गुहा

डोंगरांच्या गर्भातील अज्ञात स्थळे

अन् वाढविली आहे आपली संघर्ष क्षमता " ५

जेव्हा आदिवासी चळवळीला यश आले,आदिवासी बंधू भगिनी आपल्या लढ्यासाठी सुसज्ज झाले तेव्हा हे दृश्य पाहून कवी मनाच्या गाभाऱ्यात शंखनाद झाला आणि शब्दांच्या लहरीतून व्यक्त होताना ते म्हणतात की रानातील दिवे म्हणजे जागरूक आदिवासी बांधव आता समाजातील सर्व डावपेच ओळखतात.स्वरक्षणार्थ त्यांनी योजना आखून ठेवल्या आहेत.त्यांना आता कसलीच भीती नाही.नागरी लोक जीवनाविषयी ते आता भीती बाळगत नाही.संकटरुपी प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या वादळाला आता ते हुलकावून लावतात. स्वतःमध्ये निर्माण झालेली ऊर्जा शक्ती इतकी प्रचंड आहे की वादळ सुद्धा आता काहीच परिवर्तित करू शकत नाही.एकजुटीचे महत्त्व या कवितेतून कवीने विषद केले आहे.अशाप्रकारे प्रा. डॉ.विनायक तुमराम यांची कविता मानवतावादी आणि समानतेचा ध्यास घेणारी कविता आहे .

***२ उषाकिरण आत्राम् -लेखणीच्या तलवारी***

वेदनेच्या वलयाची भाषा जिला कळली ती कवयित्री म्हणजे उषाकिरण आत्राम्.सामाजिक,राजकीय,नैतिक अशी उद्दामी बैठक असणारी कविता म्हणजे उषाकिरण आत्राम् यांची कविता.जीवन जगणे आणि इतरांना बरोबर घेऊन जगणे यातील भेद जिला कळला अशी कवयित्री म्हणजे उषाकिरण आत्राम् .उषाकिरण आत्राम् या कवयित्रीला डॉ.दीपक कुमार वळवी 'मेंदू धुवून काढणारी कवयित्री ' म्हणून संबोधतात. 'लेखणीच्या तलवारी ' बद्दल ते म्हणतात , " म्होरकी, मोटॅरिन आणि यानंतरचा काव्यानुभव म्हणजे 'लेखणीच्या तलवारी ' हा होय.कवितासंग्रहातून व्यक्त होतांना चिंतनाचा आवाका किती मोठा असू शकतो हे लेखणीच्या तलवारीतून शब्दाबरोबर अनुभवास येते हे निर्विवाद सत्य नाकारता येत नाही.उषाकिरण आत्राम यांची कविता परिवर्तनाची आहे.नशीब जिकडे नेईल तिकडे गेले पाहिजे ही पारंपारिक विचारसरणी बदलून नशिबाला दोष देण्यापेक्षा नशिबाला घडविण्याचा ते प्रयत्न करताना दिसतात. " ६ गोंडी,मराठी,हिंदी,झाडी बोली,वऱ्हाडी बोली मध्ये कविता लिहिणारी कवयित्री आपल्या काव्यातून समाज परिवर्तन घडवू इच्छिते आणि समाज मुल्यांना जपत नवचैतन्याची,परिवर्तनाची व्याख्या उराशी बाळगते आपल्या लेखणीत संपूर्ण विचारशक्ती पणाला लावत आदिवासी बंधू भगिनींना मार्गदर्शन करते.लेखणीच्या तलवारी मधील पहिलीच कविता उजेडपाडी या कवितेत आई आणि मुलगी या दोघींमधील नवविचार पेरणारा सुंदर संवाद कवयित्रीने साकारला आहे तो पुढील प्रमाणे

"आपलं नसीबच तस्सं

लोणी काढायचं आणि ताक इकत घ्याचं! " ७

या दोन ओळीतच आदिवासी समूहाचे संपूर्ण जीवन चित्र स्पष्ट होते म्हणजे सर्वच बाबतीत समृद्धता असणाऱ्या आदिवासी समाजाला ज्या परिस्थितीतून जावे लागते ती परिस्थिती इथे स्पष्ट होते.जीवन जगण्याचा केंद्रबिंदू जवळ असून देखील आदिवासी समाजाला परिघात फिरत राहावे लागते .पुढे याच कवितेत मुलगी जळजळीत सत्य बोलून आशावाद निर्माण करते तो असा ,

"आपला दिवा आपणच होवाचं

आपल्या नशिबाचा धुणं आपणच धुवाचं "

"माय !मी सावित्रीसारखं शिकीन

बाबासाहेबासारखं पुस्तक वाचीन "

समद्या रानाच्या कोनाकानात दरीखोरीत

झोपडीखोपडीत उजेड पाडीन

दुनियेचे नशीब बदलून काढीन

मी!पुस्तक इक्कत घेतलं

एका सुर्व्यानं इकडची दुनिया तिकडे केली

मग मी कशी नाही बदलणार ? " ८

वरील कवितेत सावित्री आईचा आणि बाबासाहेबांचा आदर्श घेत मुलगी लढण्यासाठी तुतारी फुंकते .शिक्षणाने हवे तसे परिवर्तन करता येते याची पुरेपूर जाणीव कवितेतील मुलीला आहे .शिक्षणाने मानव जातीचा उद्धार करणे शक्य आहे हे ती जाणते आणि आपल्या आईला येणाऱ्या उज्वल भविष्याबद्दल आश्वस्त करते . पुढे पुढे कविता वाचत जाताना कवयित्रीच्या काव्यातील खोल गाभ्याचा स्पर्श होतो.कविता कधी सामाजिक भान जपताना दिसते तर कधी लोक मनाच्या विचारव्यूहातून चपखलपणे सावरतांना

दिसते.आपली बाजू कशी मांडायची हे दर्शवते.सामाजिक जाणिवेचा विस्तव बाजूला सारत मानवतेचा मार्ग शोधताना जाणवणारा दाह कवयित्रीच्या बहूतेक कवितेतून जाणवतो .कवयित्री पुढे लिहिते की ,

"या वाळूच्या घरावर । ठेवू नका भरोसा

या फसव्या तटबंदीवर । घेऊ नका विसावा

बगलेत शस्त्र ज्यांच्या । हासूनि बोलती जे

तोंडात साखरेचा,ते घोळतात गोंडा

लपूनी वार जे करती । मुखात 'श्री' त्यांच्या

काटे उरात भरती । ठेवू नका भरोसा ..." ९

वाळूचा गुणधर्म सर्वज्ञातच आहे.कवयित्री आपल्या बंधू भगिनींना आपला काव्यातून जागृत करते.फसव्या तटबंदीवर म्हणजे खोट्या आश्वासनांवर,खोट्या प्रलोभनांवर भरवसा ठेवल्यास त्याचे परिणाम वाईट होतील असा सूचक संदेश देते.वर वर गोड बोलणाऱ्या लोकांविषयी चांगुलपणाचा ग्रह करून घेऊ नये असे कवयित्री सांगते.मुखवट्या मागचे चेहरे आपल्या बंधू भगिनींना ओळखायला आले पाहिजे म्हणून योग्य दिशादर्शक विचार कवितेच्या माध्यमातून मनामनात बिंबवू इच्छिते पुढे कवयित्रीची लेखणी आणखी धारदार झाल्याचे दिसून येते . जसे कि ,

"किल्ल्याच्या बाहेर फितूर दडून बसलेत

त्यांना जुन्या खिंडारात दे गाडून ! "

हो-वीर बाबुराव !

रघुनाथ,शंकरशहा

हो-बिरसा-हो तंट्या !

हो भिमू कुमरा - तुला माझी शपथ ! " १०

'आमचे श्रृंगारमरण ' या कवितेतील ह्या ओळी आहेत.कवयित्री या कवितेतून अतिशय प्रखरपणे आपले क्रांतिवादी विचार प्रकट करते.कवयित्री कवितेत आदिवासी बंधूंना समाजातील कूटनीतीचे राजकारण समजावत प्रलोभनांना बळी न पडण्याचे आवाहन करते.उलगुलांचा अर्थ समजावते.विविध रूपकांचा उपयोग करून आपले मत प्रकट करते. मैलाचा पत्थर व्हायला सांगते.कुपोषण, भूकबळी,शोषणाचे बळी या नावाखाली फसवणारे लोक जागोजागी सापडतात परंतु त्यांच्यापासून सावध राहण्यास कवयित्री इशारा देते. आदिवासींच्या नावाने लाखोंच्या योजनांचा फायदा घेणारे लोक आहेत त्यांच्या या राजकारणाला बेधडक सामोरे जाण्यास सज्ज होण्यासाठी तरुणांना तयार व्हायला सांगते.महिलांमध्ये जागृती निर्माण करताना त्यांच्या शिक्षणाला महत्त्व ती देते.स्त्रियांच्या दुःखाला जाणत त्याविरुद्ध आवाज उठवण्याचा संदेश देते स्त्रीवादाची जाणीव आपल्याला या पुढील कवितेतून होते

"आई पासून मोठे झालो

ती पायथा आम्ही हिमालय झालो

पायी तिच्या काटे मोडले

फुल गुलाब आम्ही झालो

त्या ऋणाची उतराई करण्या

उन्नती करूया महिलांची

ज्योत पेटवा ज्ञानाची " ११

एकाच आईच्या उदरी जन्माला येऊन सुद्धा समाजात असलेल्या विषमते विरुद्ध कवयित्री आपले मत प्रकट करते .हिमालय आणि पायथ्याची उपमा स्पष्ट करते .शिक्षण आणि स्त्री जातीचा उद्धार होईल म्हणून ज्ञानाची ज्योत पेटवायला सांगते .स्त्री आणि पुरुष यांना समानतेची वागणूक मिळायला हवी अशा विचारांची पेरणी करते.अशाप्रकारे कवयित्रीने झाडीबोलीत गीते सुद्धा लिहिलेली आहेत त्यांचे गीत,सर्व साहित्य संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे तर बाहेर सुद्धा आदराने वाचले जाते. स्त्रियांसाठी प्रेरणास्त्रोत ठरलेली,समाजात विचार परिवर्तन करण्याची ताकद असणारी कविता उषाकिरण आत्राम यांची

आहे.नावातच उषाकिरण असलेली कवयित्री आपल्या विचारांच्या प्रकाश झोताने संपूर्ण लोक आसमंत उजळवून टाकते.

***३ प्रा.डॉ. संजय लोहकरे - आदिवासी स्वातंत्र्याचा जाहीरनामा***

'आदिवासी स्वातंत्र्याचा जाहीरनामा' या काव्यसंग्रहातील प्रा. डॉ.संजय लोहकरे यांची कविता म्हणजे अन्यायाला चिरून काढणारी जिवंत तलवार आहे त्यातील शब्द न् शब्द थेट काळजाला भिडतो आणि नसानसांतून प्रवेश करत अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी ऑक्सिजन ठरतो.तीक्ष्ण धारदार शब्दप्रयोग त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य आहे.वाचताना सरळ सरळ भासणारी कविता विचार गर्भात जेव्हा प्रवेश करते तेव्हा वाचकाचा मेंदू सुन्न होतो.आपल्या बंधू भगिनींविषयी असलेली तळमळ प्रत्येक अक्षरा अक्षरांतून पाझरताना दिसते.पाझरणाऱ्या शब्दाचा एक एक थेंब जरी सर्वांपर्यंत पोहोचला तरी समानतेचा गुणधर्म घेऊन वाहणारी नदी आणखी प्रवाही व्हायला वेळ लागणार नाही.झालेल्या अन्यायाला रोखठोक उत्तर देण्याची क्षमता त्यांच्या कवितेत आहे.सरकारी योजनांवर टिपणी करतांना ते लिहितात कि ,

"योजना चालू आहेत

विकास होतो आहे

आदिवासी प्रवाहात येतो आहे

शिक्षणाची गंगा पोहोचते आहे

सरकार आदिवासींचे मायबाप आहे

वांझोटे बोर्ड बॅनर बातम्या

टी .व्ही वर, मासिकांतून बिनधास्त छापल्या

वाचणारे वाचतात बघणारे बघतात . " १२

स्वातंत्र्य मिळालं तसं सर्वांनाच वाटलं की मानवतेचे राज्य चालू होईल,सर्वांना समान संधी मिळेल परंतु स्वार्थापोटी अनेक राजकारणीयांनी मोठमोठे स्वप्न दाखवले.प्रलोभने दिली.आपल्याच कर्तव्यापासून लोकांना दूर केले. विकासाच्या मोठमोठ्या गोष्टी झाल्या टीव्ही,मासिके सर्व मीडियावर

आदिवासींच्या विकासाच्या योजनांचा देखावा झाला पण प्रत्यक्षात मात्र अजूनही सरकारी योजनेसाठी आदिवासी बंधू गाव -गाव शहर -शहर आपल्या पायदाणा घासत आहेत आणि शेवटी निराशाच पदरी पडते आहे. अतिशय रोखठोक भाषेत यंत्रणेवर कवीने घनाघात वार केलेला आहे. आपल्या अस्तित्वाबद्दल स्वातंत्र्याबद्दल ते पुढे लिहितात कि

"आमच्याच जंगल जमिनीवरून

आम्हालाच उठविणारे

कोणत्या मानवतावाद जोपासता ?

आम्ही माणसं नाहीत का ? " १३

आदिवासी म्हणजे कंदमुळाप्रमाणे जमिनीत खोल शिरलेले फळ आहे त्याला स्वातंत्र्याची गरज नाही यावरील ओळीतून कवीने समाज व्यवस्थेला थेट प्रश्न विचारले आहेत जे या जगाचे संस्कृतीचे मूळ आहे ही माय भूमी जमीन ही धरा ज्यांच्या मालकीची आहे त्यांना स्वातंत्र्य मिळवून देणारे तुम्ही कोण त्यांच्या विकासाचा आराखडा आखणारी तुम्ही कोण आदिवासी मूळ आहे आणि हे जमिनीला घट्ट धरून राहणारच .पुढे कवी म्हणतो की फुटबॉलच्या किक प्रमाणे आम्ही असं स्वातंत्र्य लाथाडतो.जागतिकीकरण आणि सांस्कृतिक संक्रमणावरही कवी आक्षेप दर्शवतो.धरणग्रस्त आणि प्रकल्पग्रस्त ठरविल्या गेलेल्या आपल्या आदिवासी बंधू भगिनींविषयी कवीच्या मनात असलेली जाणीव पुढील ओळीतून स्पष्ट होते

"घटनेत नोंद करू सगळ्यांना समान भाकरीची

सर्वांची घरे एकसारखी

सर्वांची पोरं एका शाळेत

संपत्तीत सर्वांचा वाटा सारखा

जितके काम तितकंच दाम

समतेची भाषा बदलूया अर्थासहीत

न्याय आणि स्वातंत्र्य नैसर्गिक करू

मानवतावादाची पारायणे घरोघर लावू

आमच्या संस्कृतीत परंपरेने आलेली

'माणुसकी' हीच घटनेच्या पहिल्या पानावरची ओळ " १४

आपल्या बंधू भगिनींवर झालेल्या अन्यायाने कवी पेटून उठतो आणि काजळी धरलेल्या दिव्यांची शब्दांनी काजळी काढत तेजस्वितेची वाट दाखवतो.हा लख्ख प्रकाश पृथ्वीवरच्या प्रत्येक जीवाला सरस ठरेलच असे नाही पण ज्यांना मानवतेची व्याख्या कळली ते या प्रकाशाने स्वतःला दिपवल्याशिवाय राहणार नाही.समानतेसाठी आपण लढाई लढू आणि न्याय व स्वातंत्र्याचे अर्थ सांगू,मानवतावादाची पारायण घरोघरी लावू आणि जी जगण्याची खरी व्याख्या आहे ती म्हणजे माणुसकी, हीच ती ,जी आपल्या संस्कृतीने आपल्या परंपरेने वारशात दिलेली शिदोरी आहे तीच घटनेच्या पहिल्या पानावरची ओळ आहे हे जगाला पटवून देऊ .

अशाप्रकारे मानवतेच्या पंगतीत बसणारी प्रा. डॉ. संजय लोहकरे यांची कविता आहे. श्रेष्ठ कनिष्ठतेच्या पलीकडे जाऊन समानतेच्या कायद्यालाच कायदा मानणारी,ठासून सांगणारी कवीची कविता आहे.येणाऱ्या पिढीसाठी निश्चितच दिशादर्शक ठरणारा असा काव्यसंग्रह कवीचा आहे.समान मूल्याची जपणूक करण्याची प्रतिज्ञा जी कवीने घेतली आहे ती निश्चितच फळाला येणार आहे .

*** निष्कर्ष***

आदिवासी कविता ही मानवतेच्या मुल्यावर भर देणारी आणि समानतेचा हक्क प्रस्थापित करणारी माणुसकीचा वारसा लाभलेली भरभक्कम अशी लेखणी आहे . प्रा.डॉ.विनायक तुमराम,प्रा.डॉ. संजय लोहकरे, बालविकास प्रकल्प अधिकारी उषाकिरण आत्राम या सर्वांची कविता आदिवासी समूहास दिशा दर्शवणारी आहे .स्वत्वाच्या भावनेची जपणूक करताना समाजाचा विकास कसा घडवून आणावा अशी शिकवण कवितेतून मिळते.स्पर्धेच्या युगात जगायचं असेल तर एकजुटीची समृध्दी आवश्यक आहे असा बोध होतो .

**संदर्भ ग्रंथ:**

१ .डॉ.अक्षय कुमार काळे, उलगुलानव्रती,सुनील कुमरे,१९ जानेवारी २०१४ पृष्ठ क्र.१

२ .डॉ . प्रमोद मुनघाटे तत्रैव पृष्ठ क्र .१०९

३. प्रा. डॉ. विनायक तुमराम,रानगर्भातील जखमा,परिमल धनकर हरिवंश प्रकाशन ,पृष्ठ क्र .२५

४ .तत्रैव पृष्ठ क्र. ५४

५ .तत्रैव पृष्ठ क्र . ६४

६ . डॉ .दीपककुमार वळवी,आदिवासी साहित्य, डॉ. संजय लोहकरे रामदास किसन गिळंदे १५ नोव्हें. २०१८, पृष्ठ क्र.१९

७. उषाकिरण आत्राम्,लेखणीच्या तलवारी,उषाकिरण आत्राम् ,१४ नोव्हें .२००९,पृष्ठ क्र .११

८ . तत्रैव पृष्ठ क्र. १२

९ .तत्रैव पृष्ठ क्र. ४०

१० . तत्रैव पृष्ठ क्र. ५०

११ . तत्रैव पृष्ठ क्र. ८७

१२ . प्रा. डॉ.संजय लोहकरे, आदिवासी स्वातंत्र्याचा जाहीरनामा,मेधा पब्लिशिंग हाऊस ९ऑगस्ट २०१७ पृष्ठ क्र. ४६

१३.तत्रैव पृष्ठ क्र . ४७

१४. तत्रैव पृष्ठ क्र. ४९